दै. दिव्यमराठी 13-10 2024

अविष्कार स्पर्धेतील कामगिरी

## पोस्टर, मॉडेल सादरीकरण स्पर्धेत योगिराज अव्वल



**धाराशिव** | डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठांतर्गत घेण्यात आलेल्या अविष्कार २०२४-२५ स्पर्धेत आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाच्या के. टी. पाटील कॉलेज ऑफ एमबीए महाविद्यालयातील (प्रथम वर्ष) योगिराज वेदपाठक यानी 'वाणिज्य व्यवस्थापन गटातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याने मॉडर्न ॲग्रिकल्चरल बिझनेस आयडिया विथ हेल्थ ऑफ अलगी' या विषयावर पोस्टर व मॉडिल सादरीकरण केले. ही स्पर्धा धाराशिव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उपकेंद्रात घेण्यात आली होती. यशाबद्दल योगिराज याचे प्राचार्य डॉ. रेखा शेरकर, प्रा. धर्माधिकारी, मॅडम व प्रा. गंगावणे व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

Scanned with OKEN Scanner

दिव्य मराठी
धाराशिव जिल्हा 13-10-2024

# अविष्कार स्पर्धेतील कामगिरी

## पोस्टर, मॉडेल सादरीकरण स्पर्धेत योगिराज अव्वल



धाराशिव | डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठांतर्गत घेण्यात आलेल्या अविष्कार २०२४-२५ स्पर्धेत आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाच्या के. टी. पाटील कॉलेज ऑफ एमबीए महाविद्यालयातील (प्रथम वर्ष) योगिराज वेदपाठक यानी 'वाणिज्य व्यवस्थापन गटातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याने मॉडर्न ॲग्रिकल्चरल बिझनेस आयडिया विथ हेल्थ ऑफ अलगी' या विषयावर पोस्टर व मॉडेल सादरीकरण केले. ही स्पर्धा धाराशिव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उपकेंद्रात घेण्यात आली होती. यशाबद्दल योगिराज याचे प्राचार्य डॉ. रेखा शेरकर, प्रा. धर्माधिकारी, मॅडम व प्रा. गंगावणे व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

Scanned with OKEN Scanner

दैनिक संघर्ष समाजवादाचा | धाराशिव | गुरुवार दि. १४/०३/२०२४

# के. टी. पाटील एम.बी.ए. महाविद्यालयाची औद्योगिक भेट उत्साहात संपन्न




**धाराशिव दि. १३ (प्रतिनिधी)** धाराशिव येथील आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचालित के. टी. पाटील कॉलेज ऑफ एम. बी. ए. या महाविद्यालयाची औद्योगिक भेट उत्साहात संपन्न झाली. भेटीमध्ये महाविद्यालयाने श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रकिया संघ लि. ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर या औद्योगिक वसाहतीस भेट दिली. या भेटीत विद्यार्थ्यांना दूध उत्पादन प्रकिया तसेच विविध दुधापासून तयार होण्याऱ्या वस्तूंची माहिती देण्यात आली. औद्योगिक भेटीस महाराष्ट्र शासनाचे दुग्धविकास उपसंचालक आयुक्त (अभियंता) महेश मुळे तसेच बुधने यांचे मौल्यवान मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री. आदित्य पाटील व प्राचार्य श्री. गणेश जगताप यांच्या परवानगीने औद्योगिक भेटीचे नियोजन करण्यात आले होते. औद्योगिक भेट विभाग प्रमुख प्रा. श्री. ए. बी. गंगावणे, यांनी सहलीचे नियोजन केले. उपप्राचार्य सौ. रेखा शेरकर तसेच प्रा. सुप्रिया भालेराव, श्री.डोलारे सर, श्री.पुजारी सर, श्री.विकास टेळे तसेच एम. बी. ए. च्या सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

Scanned with OKEN Scanner

लोकमत
गुरुवार १४.३.२०२४

# हॅलो धाराशिव

https://epaper.lokmat.com




## विद्यार्थ्यांनी दिली उद्योगांना भेट

**धाराशिव :** येथील आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचालित के.टी. पाटील कॉलेज ऑफ 'एमबीए'च्या विद्यार्थ्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघास भेट दिली. यावेळी येथे दुधापासून उत्पादित होणाऱ्या पदार्थांची माहिती घेतली. या औद्योगिक भेटीसाठी दुग्धविकास उपसंचालक महेश मुळे, बुधने यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी विद्यार्थ्यांसमवेत उपप्राचार्य रेखा शेरकर, प्रा.सुप्रिया भालेराव, डोलारे, पुजारी, विकास टेळे हेही उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

रविवार, २८ मे २०२३
पुण्य नगरी
SMART धाराशिव

# के.टी. पाटील एमबीएच्या विद्यार्थ्यांची सोलापूरच्या कंपनीस भेट



**धाराशिव :** येथील के टी. पाटील एमबीए कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच सोलापूर औद्योगिक वसाहतीमधील प्रीसीजन कॅमशॉफ्ट या कंपनीस शैक्षणिक भेट देऊन माहिती घेतली. यावेळी महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ गणेश जगताप, प्रो. अफरीन पटेल, प्रो. आनंद गंगावने, बालाजी पुजारी, विकास टेळे यांच्यासह विद्यार्थी या शैक्षणिक भेटीत सहभागी झाले होते. यावेळी एमबीएच्या विद्यार्थ्यांनी सदरच्या भेटीतून कपंनीचे कामकाज, तेथील मॅनेजमेंट आदींची प्रत्यक्षात पाहणी करून व्यवस्थापनाकडून माहिती घेतली. यावेळी कंपनीचे पीआरए संदीप मस्के व मनिष देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

Scanned with OKEN Scanner

दि. 24-05-2023

दैनिक संघर्ष

# के.टी. पाटील कॉलेज ऑफ एम.बी.ए.वतीने प्रिसीजन कॅमशाफ्ट कंपनीस औद्योगिक भेट



धाराशिव – प्रतिनिधी

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित के.टी. पाटील एम.बी.ए. महाविद्यालय, उस्मानाबाद यांची औद्योगिक भेट दिनांक २० मे २०२३ रोजी प्रिसीजन कॅमशाफ्ट लिमिटेड, सोलापूर या कंपनीला देण्यात आली.यामध्ये विद्यार्थी व महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. गणेश जगताप, प्रो. आफरीन पटेल (इंडस्ट्रीज सेल), प्रो. आनंद गंगावणे तसेच बालाजी पुजारी, विकास टेळे हे कर्मचारी उपस्थित होते. याभेटीमध्ये कंपनीचे पीआरए ऑफिसर संदिप पिस्के व माधव देशपांडे यांनी उत्कृष्ट प्रकारे सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन संपूर्ण माहिती दिली.

Scanned with OKEN Scanner

आपण वाचत आहात देशातील सर्वात विश्वासार्ह अन् प्रथम क्रमांकाचे वृत्तपत्र

दिव्य मराठी

सोलापूर

गुरुवार २५ मे २०२३

## के.टी. पाटील एमबीए कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी केला औद्योगिक अभ्यास



धाराशिव। येथील के. टी. कॉलेज ऑफ एमबीए कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सोलापूर येथील कंपनीला भेट देऊन तेथे चालणाऱ्या विविध औद्योगिक बाबींचा अभ्यास केला. आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित के. टी. पाटील एमबीए कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सोलापूर येथील प्रिसीजन कॅमशाफ्ट लिमिटेड या कंपनीला भेट दिली. यामध्ये विद्यार्थी व महाविद्यालयाचे संचालक डॉ. गणेश जगताप, इंडस्टीज इंन्स्टयुट सेलच्या प्रा. आफरीन पटेल, प्रा. आनंद गंगावणे, बालाजी पुजारी, विकास टेळे, उपस्थित होते. यावेळी संदिप फिस्के व माधव देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना कंपनीच्या कामकाजाची सर्व माहिती दिली.

Scanned with OKEN Scanner

सकाळ धाराशिव
छत्रपती संभाजीनगर, गुरुवार, २५ मे २०२३
TODAY

# 'के. टी. पाटील'च्या विद्यार्थ्यांची प्रिसिजन कॅमशाफ्ट कंपनीला भेट

**धाराशिव, ता. २४ :** के. टी. पाटील कॉलेज ऑफ एम. बी. ए. च्यावतीने सोलापूर येथील प्रिसिजन कॅमशाफ्ट या कंपनीस औद्योगिक भेट देण्यात आली.

यामध्ये विद्यार्थी व महाविद्यालयाचे संचालक डॉ.गणेश जगताप, अफरीन पटेल, आनंद गंगावणे तसेच बालाजी पुजारी, विकास टेळे हे कर्मचारी उपस्थित होते. या भेटीत कंपनीचे जनसंपर्क अधिकारी संदीप पिस्के व माधव देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

Scanned with OKEN Scanner